# रविवारी डुकरू आलं घरी

## आपंलेचिअन लोककथा





# रविवारी डुकरू आलं घरी

## आपंलेचिअन लोककथा





फार फार वर्षांपूर्वी एक डुक्कर-आई होती. टॉमी, विली, जॅकी ही तिची तीन गोंडस डुकरू-बाळं होती.



तिन्ही पिलं जेवायची, झोपायची, पुन्हा जेवायची, झोपायची. असे खूप खूप दिवस गेले. पिलं मोठी झाली, इतकी मोठी झाली की ती आपल्या गुहेत मावेनाशी झाली.



एके दिवशी डुकराईनं थोरल्या टॉमीला बोलावलं. “बाळा, आता तू घराबाहेर पड, स्वतःचा सांभाळ स्वतः करायला शीक.” त्या रात्री आईनं घराबाहेर राहताना टॉमीला ज्या ज्या गोष्टींची गरज पडेल त्या साऱ्या गोष्टी जमवल्या.



दुसरे दिवशी सकाळी नाश्त्यानंतर टॉमीला जवळ घेऊन आई म्हणाली, “दोन गोष्टी लक्षात ठेव: घर बांधशील तर दगडविटांचं बांध. आणि रविवारी न विसरता आईला भेटायला ये.”





टॉमी आपली डबागाडी ओढत रस्त्यानं जात होता. रस्त्याच्या कडेला झुडुपांत दडून बसलेला कोल्हा त्याला दिसलाच नाही.

टुणकन् उडी मारून कोल्हा त्याच्यासमोर आला. “डुक्कूबाळ डुक्कूबाळ, कुठं निघालास?” कोल्ह्यानं विचारलं.

“मी घर बांधणार, आपला आपण राहणार,” टॉमी म्हणाला.



“डुक्कूबाळ, घर कशाचं बांधणार?” कोल्ह्यानं चौकशी केली.

“आई म्हणाली घर बांध दगड-विटांचं,” टॉमीनं उत्तर दिलं.

“दगड-विटा? नको नको. दगडी घर अंगावर पडलं तर चेंदामेंदा होईल तुझा! तू मक्याच्या पऱ्हाट्यांचं घर बांध छान.”



दूर अंतरावर एके ठिकाणी टॉमीनं पऱ्हाट्यांचं टुमदार घर बांधलं.

त्या रात्री स्वयंपाक करताना त्यानं आवाज ऐकला: ‘गट्टम्!’



कोल्ह्यानं एक लहानसं डुक्कर गिळल्याचा तो आवाज होता.



...रविवारी टॉमी घरी आला नाही, आईला भेटला नाही.



दरम्यान अन्य दोन पिलं खात होती, झोपत होती. आईनं विलीला जवळ बोलावलं: "बाळा, आता घराबाहेर पड. स्वतःचा सांभाळ स्वतः करायला शीक." त्या रात्री तिनं विलीला घर सोडल्यानंतर ज्या ज्या वस्तूंची गरज भासेल ते सारं सामान गोळा केलं.



दुसरे दिवशी आई विलीला म्हणाली, "दोन गोष्टी सांगते: घर बांधशील तर दगड-विटांचं बांध. आणि रविवारी आईला भेटायला ये - नक्की ये." मग तिनं विलीचा पापा घेतला. विली निघाला.



गच्च भरलेली हातगाडी ढकलणं लहानशा डुकराला फार कठीण जातं. टुणकन् उडी मारून पुढ्यात उभे राहिपर्यंत झाडोऱ्यात लपलेले कोल्होबा विलीला दिसलेच नाहीत!

“डुक्कूबाळ डुक्कूबाळ, कुठं निघालास?”

“मी घर बांधणार, स्वावलंबी होणार,” विली म्हणाला.



“दगडविटांचं घर बांधणार असशील तर, डुक्कूबाळा, मी तुला प्रेमाचा सल्ला देतो - या भागातल्या दगडविटा अतिथंड आहेत. तेव्हा उबदार घर हवं असेल तर गवताच्या गंजी रचल्यात तिथं गुहा कर छानशी.



दूर अंतरावर विलीनं थेट गवताच्या गंजीतच लहानशी गुहा केली.

त्या रात्री स्वयंपाक करताना त्यानं आवाज ऐकला: ‘गट्टम्!’

कोल्ह्यानं एक लहानसं डुक्कर गिळल्याचा तो आवाज होता.

..आणि रविवारी विली घरी आईपाशी आलाच नाही.



दरम्यान आई आणि जॅकी आपल्या गुहेत जेवत होते, झोपत होते. काही दिवसांनी जॅकी आईला म्हणाला: “आता मी घराबाहेर पडलं पाहिजे, स्वतःची काळजी स्वतः घ्यायला शिकलं पाहिजे.” त्या रात्री जॅकीने आवश्यक चीजवस्तू मोठ्या पोत्यात भरून घेतल्या.

घरचा रस्ता नीट लक्षात रहावा म्हणून जॅकी चालता चालता आजूबाजूला पाहत होता. काहीवेळाने त्याला झाडीतून लपतछपत चाललेला मोठा, धिपाड, लाळगाळ्या, सुळेदार कोल्हा दिसला.





“नमस्ते कोल्हेदादा!” - अकस्मात् हे शब्द ऐकून कोल्हा इतका दचकला की त्याच्या फर वर काटाच आला!

“- मी जग अनुभवायला, आपला सांभाळ स्वतःच करायला, आपलं घर स्वतः बांधायला निघालो आहे.”

कोल्हा गालातल्या गालात हसला. “अरेच्चा! इकडच्या भागात लोक घर बांधतच नाहीत मुळी. ते झाडांखाली रहातात. पानांचं अंथरूण, पानांचंच पांघरूण घेऊन झोपतात.”



“माहितीबद्दल धन्यवाद कोल्हेदादा,” जॅकी म्हणाला. पण कोल्हा दिसेनासा होताच त्यानं दगड-विटा गोळा करण्यास सुरुवात केली.

दिवसअखेरीस दगडविटांचं एक छानसं घर बांधून झालंसुद्धा.

जॅकीने सामानाची मांडामांड केली, शेगडीत विस्तव पेटवला, शेंगांनी भरलेलं पातेलं उकळायला ठेवलं. जरा विश्रांती घ्यावी म्हणून त्यानं आरामखुर्चीत अंग टाकलं इतक्यात दारावर थाप पडली.

“कोणंय?” खुर्चीतून न उठताच जॅकीनं विचारलं.





“मी आहे कोल्हेदादा. म्हटलं, शेजारधर्म म्हणून तुला भेटून यावं.”

“आत्ता नको, मी अद्याप पाहूणचाराची तयारी केलेली नाही. तू नंतर आलास तर बरं,” जॅकी म्हणाला.

“बरं बरं, हरकत नाही,” कोल्हा म्हणाला, “पण बाहेर खूप थंडी पडलीय रे डुक्कूबाळा, मला जरा नाक तरी शेकू दे की.”

त्याला नाक शेकू दिल्याने फार काही बिघडणार नाही असा विचार करून जॅकीने दार किलकिलं केलं.



कोल्ह्यानं उघडलेल्या दारावर झेप घेताक्षणी जॅकीने धाडकन् त्याच्या नाकावर आदळून दार बंद केलं!

"नाक शेकल्यावर कसं वाटतंय?" जॅकीने चौकशी केली.

"आहाहा! मस्तऽऽ वाटतंय," कोल्हा म्हणाला, "आता जरा मला डोकं तरी शेकू दे." जॅकीने थोडा विचार केला व तो अतिशय सावकाश दार उघडू लागला.

कोल्हा पुन्हा दारावर झेपावला तशी जॅकीने थाडकन् त्याच्या मानेवर दार आपटलं. "काय मग, डोकं शेकल्यावर कसं वाटतंय?"

कोल्ह्याला धड बोलता येत नव्हतं, तो भसाड्या आवाजात म्हणाला, "वा! किती मस्त वाटतंय! आता मला अंग शेकून घेऊ दे तरी."

जॅकीनं अंमळ विचार केला व हळूहळू दारात मागल्या वेळेपेक्षा किंचित जास्त फट केली.



कोल्ह्यानं पुन्हा उडी घेतली, जॅकीने त्याच्या शेपटावर धडामकन् दार आदळलं. कोल्ह्याचं शेपूट जवळपास तुटलंच! ते दारातच अडकून राहिलं.

“हम्म, अंग शेकल्यावर कसं वाटतंय कोल्हेदादा?”

शेपूट असह्य ठणकत होतं तरी कोल्हा कसंबसं विव्हळला, “फाऽरच छान! आता फक्त शेपूट शेकून घेऊ देशील, म्हणजे मला घरी जाता येईल?”

कोल्ह्यानं निघून जावं हीच जॅकीची इच्छा होती. त्यानं हळूहळू दार किलकिलं केलं.





दारातून शेपूट सोडवून घेताच कोल्हा उडी मारून घरात शिरला. साऱ्या खटाटोपामुळे तो जाम थकला होता. उबदार विस्तवाजवळ तो आडवा झाला, व मिनिटभरातच झोपी गेला.

थोड्या वेळाने कोल्हा झोपेत बडबडू लागला: “...डुकराचं मांस आणि शेंगांचं सूप! शेंगांचं सूप आणि डुकराचं मांस! रात्री जेवण होईल झकास!”

जॅकीनं शेगडीवरच्या पातेल्याकडे पाहिलं. मग आरशात स्वतःकडे पाहिलं. कोल्हा आपल्यालाच खाण्याच्या बेतात आहे, हे त्याला कळून चुकलं!







जॅकी दरवाज्याच्या दिशेने जाऊ लागला पण कोल्ह्याने नेमकी वाटेतच ताणून दिली होती. जॅकीने खिडकी उघडली, बाहेर पाहिलं व खिडकीचं तावदान धाड्‌दिशी बंद होऊ दिलं.

कोल्हा ताडकन् उठला - "कसला आवाज झाला?"

"बाहेर कसलीशी चाहूल लागली, मी म्हटलो कोण आहे बघावं. कोल्हे-शिकारी या वाटेने जात होते" हसून म्हणाला.

"काऽय?! कोल्हे-शिकारी? मी एक कोल्हा आहे डुक्कूबाळ, मला लपव ना रे, कुठेतरी लपव पटकन्!"

घरात जॅकीच्या आईने दिलेली लोणी घुसळण्याची चरवी होती. जॅकी म्हणाला "कोल्हेदादा, मला वाटतं यात लपू शकतोस तू."

कोल्हा झटकन् चरवीत जाऊन बसला.





जॅकीने घराचं दार उघडलं, आणि लोण्याची चरवी कोल्ह्यासकट उतारावरून खाली ढकलून दिली.

‘आपण शिकाऱ्यांपासून दूर दूर चाललो आहोत’ या विचाराने कोल्हा खदखदा हसला, पण चरवी टेकडीवरून गडगडत राहिली तसं जॅकी डुकरू त्याहून मोठ्याने, मनापासून हसलं.

त्यानं चरवी धप्पकन् पाण्यात पडताना पाहिली.

नदीचा प्रवाह कोल्ह्याला इतकं दूऽर दूऽर घेऊन गेला की जॅकीला तो पुन्हा कध्धीच कुठ्ठेच दिसला नाही.





आणि त्या रविवारी जॅकी डुकरू आईला भेटण्यासाठी घरी आलं.

**समाप्त**